स्थायी समिती
दाखल विषय – दि. २/२/२०२१

विषय क्रमांक :– १०६२ त्वर्य

पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपधर्तीवर डेव्हलपमेंट क्रेडीट नोट या मोबदल्याच्या स्वरूपात शहरातील डी.पी. रस्त्यापैकी पॅकेज ३ ब अंतर्गत कल्याणीनगर ते मुंढवा दरम्यान नदीकाठाने ३०मी.रूंद व ३.४कि.मी. लांबीचा उन्नत मार्ग विकसीत करणेसाठी (एकूण अंदाजीय प्रकल्पीय र.रू.२२७ कोटी, यामध्ये प्रत्यक्षात डी.पी आर नंतर कमी जास्त फरक होवु शकतो.) पीपीपी अंतर्गत डेव्हलपमेंट क्रेडिट नोटच्या मोबदल्यात विकसीत करणेसाठी सक्सेस फी मॉडेलवर प्री टेंडर ॲक्टीव्हीटी करिता मनपा मान्य प्राप्त पॅनेलवरील तज्ञ सल्लागार कडून ई कोटेशन मागविण्यात आले असता आलेल्या ३ ई कोटेशनपैकी तज्ञ सल्लागार मे.क्रिएशन इंजिनिअर्स प्रा.लि. यांचे कोटेशन सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून प्री टेंडर ॲक्टीव्हिटीसाठी एकूण प्रकल्पीय खर्चाच्या०.४९% प्रमाणे अधिक माती परीक्षण चाचणी व तपासणी खर्च अधिक पर्यावरण ना हरकत दाखल्यासाठी होणारा शासकीय / निमशासकीय खर्च अधिक पाटबंधारे विभागाची नाहरकत दाखल्यासाठी होणारा शासकीय / निमशासकीय खर्च यासह सक्सेस फी मॉडेलवर नेमणुक करणेस व त्याच्यांबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/६८६ दि. २/२/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– १०६३ त्वर्य

पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपधर्तीवर डेव्हलपमेंट क्रेडीट नोट या मोबदल्याच्या स्वरूपात शहरातील डी.पी. रस्त्यापैकी पॅकेज २ अंतर्गत हडपसर येथील नाला नं १ ते साडेसतरानळी (पाईपलाईन रोड) येथील २४ मीटर डी पी रस्ता, अमनोरा पार्क टाऊनशिप ते केशवनगर ते माळवाडी रोड येथील प्रस्तावित अंडरपास १८ मीटर डी पी रस्ता, अमनोरा पार्क ते मगरपट्टा रोड आणि माळवाडी ते अमनोरा मॉल रोडला समांतर १८ मीटर डीपी रस्ता विकसीत करणेसाठी (एकूण अंदाजीय प्रकल्पीय र.रू.४५ कोटी, यामध्ये प्रत्यक्षात डी.पी आर नंतर कमी जास्त फरक होवु शकतो.) पीपीपी अंतर्गत डेव्हलपमेंट क्रेडिट नोटच्या मोबदल्यात विकसीत करणेसाठी सक्सेस फी मॉडेलवर प्री टेंडर व पोस्ट टेंडर ॲक्टीव्हीटी करिता मनपा मान्य प्राप्त पॅनेलवरील तज्ञ सल्लागार कडून ई कोटेशन मागविण्यात आले असता आलेल्या ३ ई कोटेशनपैकी तज्ञ सल्लागार मे.इन्फ्रार्किंग कंन्स्ल्टीग इंजिनिअर्स प्रा.लि. यांचे कोटेशन सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून प्री टेंडर ॲक्टीव्हिटीसाठी एकूण प्रकल्पीय खर्चाच्या०.४९% प्रमाणे व पोस्ट टेंडर ॲक्टीव्हिटीसाठी एकूण प्रकल्पीय खर्चाच्या १.४८% याप्रमाणे एकूण १.९७% दराने सक्सेस फी मॉडेलवर नेमणुक करणेस व त्याच्यांबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/६८७ दि. २/२/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– १०६४ त्वर्य

पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपधर्तीवर डेव्हलपमेंट क्रेडीट नोट या मोबदल्याच्या स्वरूपात शहरातील डी.पी. रस्त्यापैकी पॅकेज ३ अ अंतर्गत बंडगार्डन ते कल्याणीनगर दरम्यान नदीकाठाने ३०मी.रूंद व २.१०कि.मी. लांबीचा उन्नत मार्ग विकसीत करणेसाठी (एकूण अंदाजीय प्रकल्पीय र.रू.१४१ कोटी, यामध्ये प्रत्यक्षात डी.पी आर नंतर कमी जास्त फरक होवु शकतो.) पीपीपी अंतर्गत डेव्हलपमेंट क्रेडिट नोटच्या मोबदल्यात विकसीत करणेसाठी सक्सेस फी मॉडेलवर प्री टेंडर ॲक्टीव्हीटी करिता मनपा मान्य प्राप्त पॅनेलवरील तज्ञ सल्लागार कडून ई कोटेशन मागविण्यात आले असता आलेल्या ३ ई कोटेशनपैकी तज्ञ सल्लागार मे.क्रिएशन इंजिनिअर्स प्रा.लि. यांचे कोटेशन सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून प्री टेंडर ॲक्टीव्हिटीसाठी एकूण प्रकल्पीय खर्चाच्या०.४९% प्रमाणे अधिक माती परीक्षण चाचणी व तपासणी खर्च अधिक पर्यावरण ना हरकत दाखल्यासाठी होणारा

शासकीय / निमशासकीय खर्च अधिक पाटबंधारे विभागाची नाहरकत दाखल्यासाठी होणारा शासकीय / निमशासकीय खर्च यासह सक्सेस फी मॉडेलवर नेमणुक करणेस व त्याच्यांबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/६८८ दि. २/२/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– १०६५ त्वर्य

पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपधर्तीवर डेव्हलपमेंट क्रेडीट नोट या मोबदल्याच्या स्वरूपात शहरातील डी.पी. रस्त्यापैकी पॅकेज १ अंतर्गत खराडी स.न.३,४,७ येथील १८ मीटर डीपी रस्ता , स.न.३९,४१,५९, येथील २४ मीटर डीपी रस्ता , स.न.५९,६० येथील १८ मीटर डीपी रस्ता , स.न.४,४०,४१ येथील १८ मीटर डीपी रस्ता , स.न.३९,४१,४२,४३ येथील १८ मीटर डीपी रस्ता , स.न.३८,३९ येथील २४मीटर डीपी रस्ता , स.न.५६,५७ येथील १८ मीटर डीपी रस्ता , स.न.६७,६८,६९ येथील ३० मीटर डीपी रस्ता विकसीत करणेसाठी (एकूण अंदाजीय प्रकल्पीय र.रू.१२८ कोटी, यामध्ये प्रत्यक्षात डी.पी आर नंतर कमी जास्त फरक होवु शकतो.) पीपीपी अंतर्गत डेव्हलपमेंट क्रेडिट नोटच्या मोबदल्यात विकसीत करणेसाठी सक्सेस फी मॉडेलवर प्री टेंडर व पोस्ट टेंडर अॅक्टीव्हीटी करिता मनपा मान्य प्राप्त पॅनेलवरील तज्ञ सल्लागार कडून ई कोटेशन मागविण्यात आले असता आलेल्या ३ ई कोटेशनपैकी तज्ञ सल्लागार मे.इन्फ्राकिंग कंन्स्ल्टीग इंजिनिअर्स प्रा.लि. यांचे कोटेशन सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून प्री टेंडर अॅक्टीव्हिटीसाठी एकूण प्रकल्पीय खर्चाच्या०.४९% प्रमाणे व पोस्ट टेंडर अॅक्टीव्हिटीसाठी एकूण प्रकल्पीय खर्चाच्या १.४८% याप्रमाणे एकूण १.९७% दराने सक्सेस फी मॉडेलवर नेमणुक करणेस व त्याच्यांबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/६८९ दि. २/२/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– १०६६ त्वर्य

पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपधर्तीवर डेव्हलपमेंट क्रेडीट नोट या मोबदल्याच्या स्वरूपात शहरातील डी.पी. रस्त्यापैकी पॅकेज ४ अंतर्गत मुंढवा स.नं. ९ ते १४ व खराडी स.नं.१६/४ अ या दरम्यान मुळा-मुठा नदीवर २४मी.रूंदीचे पुल बांधणेसाठी (एकूण अंदाजीय प्रकल्पीय र.रू.४० कोटी, यामध्ये प्रत्यक्षात डी.पी आर नंतर कमी जास्त फरक होवु शकतो.) पीपीपी अंतर्गत डेव्हलपमेंट क्रेडिट नोटच्या मोबदल्यात विकसीत करणेसाठी सक्सेस फी मॉडेलवर प्री टेंडर अॅक्टीव्हीटी करिता मनपा मान्य प्राप्त पॅनेलवरील तज्ञ सल्लागार कडून ई कोटेशन मागविण्यात आले असता आलेल्या ३ ई कोटेशनपैकी तज्ञ सल्लागार मे.लायन इंजिनिअर्स प्रा.लि. यांचे कोटेशन सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून प्री टेंडर अॅक्टीव्हिटीसाठी एकूण प्रकल्पीय खर्चाच्या०.५% प्रमाणे अधिक माती परीक्षण चाचणी व तपासणी खर्च अधिक पर्यावरण ना हरकत दाखल्यासाठी होणारा शासकीय / निमशासकीय खर्च अधिक पाटबंधारे विभागाची नाहरकत दाखल्यासाठी होणारा शासकीय / निमशासकीय खर्च यासह सक्सेस फी मॉडेलवर नेमणुक करणेस व त्याच्यांबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/६९० दि. २/२/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– १०६७ त्वर्य

परिमंडळ क्र. २ मधील सर्व उद्यानांची हॉर्टीकल्चर विषयक देखभाल दुरुस्तीची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.निसर्ग लॅडस्केप प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८८,९८,१२०/– पेक्षा १९.०६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७२,०२,१३८=३३ पर्यंत देखभाल दुरुस्तीचे काम असल्याने भाववाढसूत्र वगळून काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/उदयान/६६१ दि.२९/१/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– १०६८ त्वर्य

परिमंडळ क्र. १ मधील सर्व उद्यानांची हॉर्टीकल्चर विषयक देखभाल दुरुस्तीची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.कृषीतेज डेव्हलपर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८७,१२,०००/– पेक्षा २१.६२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६८,२८,४६५=६० पर्यंत देखभाल दुरुस्तीचे काम असल्याने भाववाढसूत्र वगळून काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/उदयान/६६२ दि.२९/१/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– १०६९ त्वर्य

पुणे महानगरपालिकेच्या १.कै.सुंदराबाई गणपत राउत दवाखाना केळेवाडी २.कै.जयाबाई नानाबाई सुतार प्रसुतिगृह कोथरूड ३.कै.सहदेव एकनाथ निम्हण प्रसुतिगृह पाषाण या तीन दवाखान्यांसाठी वैदयकीय उपकरणे खरेदी करणे ( टेंडर क्रमांक ६ सन २०२०-२१ ) कामी निविदा मागविण्यात आल्या असता आलेल्या तीन निविदाधारकांपैकी ज्या ज्या निविदाधारकांनी ज्या ज्या अॅटमकरीता सर्वात कमी दर दिलेला आहे त्या त्या निविदाधारकाकडून त्या त्या अॅटमची खरेदी करण्यात येणार असल्याने मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या खरेदी तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे १.क्वॉलीसर्ज सर्जिकल्स प्रा.लि.यांचेकडून रक्कम रूपये ६,०७,६००/- २.आर.एस.एंटरप्राईजेस यांचेकडून रक्कम रूपये ३,६०,५००/- ३.ऑस्टीन हेल्थ केअर यांचेकडून रक्कम रूपये ३७,९७,०४५/- असे एकुण जीएसटी करासह रक्कम रूपये ४७,६५,१४५/-(अक्षरी रक्कम रूपये सत्तेचाळीस लाख पासष्ट हजार एकशे पंचेचाळीस फक्त ) पर्यंत वैदयकीय उपकरणांची खरेदी करणेस,त्यांच्याशी आवश्यक तो करार करणेस व खाली नमुद केलेल्या लेखाशिर्षावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/६५९ दि.२८/१/२०२१ चे पत्र.

अर्थशिर्ष - नियोजन विभाग-मागणी क्रमांक ओ-१०, ४५१५, इतर ग्रामविकास विकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च १०२-सामुहिक विकास पंचवार्षिक योजना अंतर्गत योजना - राज्य योजना अंतर्गत योजना (१) बहहुउददेशीय कार्यक्रम (००)(०१) आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम ( ४५१५००१२ ) ( योजनाअंतर्गत) ( दत्तमत) ५३ मोठी बांधकामे.

विषय क्रमांक :– १०७० त्वर्य

दि.३१/३/२०२१ पर्यंतच्या व पुढील आर्थिक वर्षासाठी अतिक्रमण विभागामार्फत होणाऱ्या ई-लिलावासाठी डिलीव्हरी कमिटीमध्ये मा.स्थायी समितीतील खालील दोन सदस्यांच्या नावाचा समावेश करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/अतिक्रमण/६६० दि.२९/१/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– १०७१ त्वर्य

कोथरुड बावधन क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात प्रभाग क्र. १० मध्ये विविध रस्त्यांवर पाणीपुरवठा वाहीनी/मल:सारण वाहीनी/गॅस वाहीनी/वीज वाहीनी तसेच केबल खोदाईचे रिईन्स्टेटमेंट करणे तसेच इतर तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.काशीनाथ सिताराम कुमावत यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४४,१४,८८४=०५ पेक्षा ३५.८०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२८,३४,३५५=५६ पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ५,२९,७८६=०९ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये ५५,१२२=६० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग र.रुपये ०=०० पर्यंत अदा करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/६७८ दि.१/२/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– १०७२ त्वर्य

धनकवडी सहकारनगर क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत विविध ठिकाणी पॅचवर्क कामे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.निलेश तरवडे कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४४,६३,२८७=५० पेक्षा ३४.४४% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२९,२६,१३१=२९ पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ५,३५,५९४=५० पर्यंत अदा करणेस/कपात करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/६७९ दि.१/२/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :- १०७३ त्वर्य

वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात प्रभाग क्र. १३ मध्ये विविध रस्त्यांवर पाणीपुरवठा वाहीनी/मल:सारण वाहीनी/गॅस वाहीनी/वीज वाहीनी तसेच केबल खोदाईचे रिईन्स्टेटमेंट करणे तसेच इतर तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १० टेंडर्सपैकी ठेकेदार मे.श्री.साई उदयोग यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४०,१०,९१८=१६ पेक्षा ३३.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२६,८७,३१५=०६ पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ४,८१,३१०=१६ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये ०=०० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग र.रुपये ७,७७०/- पर्यंत अदा करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/६८० दि.१/२/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :- १०७४ त्वर्य

प्रभाग क्र. ४० क मधील दत्तनगर चौक ते शनिनगर चौक मुख्य रस्ता विकसीत करणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.श्री.विठ्ठल एंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१,६८,००,१६८=६० पेक्षा १८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,३७,७६,१३८=२५ पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये २०,१६,०२०=२३ अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये १,३५,६८६=४० अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ४८,००१/- पर्यंत विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) फरक अदा करणेस/कपात करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/६८१ दि.२/२/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :- १०७५ त्वर्य

आरोग्य विभागाकडील अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजना व शहरी गरीब योजना विभागाकडील वैद्यकीय प्रतिपूर्तीचे बिलांसाठी पुणे मनपाचे सन २०२०-२१ या कोविड -१९ MOU RE17F153H या अर्थशिर्षकामधून खालीलप्रमाणे र.रु. ८ कोटी वर्गीकरणाने उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/६८२ दि.२/२/२०२१ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०-२०२१ चे अंदाजपत्रक, आरोग्य कार्यालय पुणे महानगरपालिका, कोविड -१९ MOU RE17F153H | ८,००,००,०००/- | ---- |
| सुचवलेली कामे<br>आरोग्य कार्यालय पुणे महानगरपालिका,<br>१) RE17F-153D, ७ क रुग्णालये, प्रसुतीगृहे, औषधालये क. सेवकांसाठी आरोग्य सहाय्य योजना ब२. मनपा सेवकांसाठी रिएम्बर्समेंट | ---- | ४,००,००,०००/- |
| २) RE17F-154 -, ७ क रुग्णालये, प्रसुतीगृहे, औषधालये, क. सेवकांसाठी आरोग्य सहाय्य योजना पुणे शहरातील झोपडपट्टीमध्ये राहणारे पिवळे रेशकार्डधारक / वार्षिक उत्पन्न र. रु. एक लाखापर्यंतच्या नागरीकांसाठी पुणे मनपातर्फे आरोग्य सहाय्य योजना | ---- | ४,००,००,०००/- |

विषय क्रमांक :- १०७६ त्वर्य

प्रभाग क्र. ३१ वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात विविध रस्त्यांवर पाणीपुरवठा वाहीनी/मल:सारण वाहीनी/गॅस वाहीनी/वीज वाहीनी तसेच केबल खोदाईचे रिईन्स्टेटमेंट करणे तसेच इतर तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.गाजुल कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४०,१०,९१८/- पेक्षा ३४.१७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२६,४०,३८७=३२ पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ४,८१,३१०=१६ अधिक मटेरियल टेस्टिंग र.रुपये ७,७७०/- पर्यंत अदा करणेस/कपात करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/६८३ दि.२/२/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– १०७७ त्वर्य

**सन २०२१–२२ व त्यापुढील आर्थिक वर्षांतील मिळकत कराची देयके, वॉरन्ट, नोटीसेस वाटप व इतर बाबत** खालील बाबीस मान्यता देण्याबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/कर आ.कर संक./६६६ दि.१/२/२०२१ चे पत्र.

**१. पुणे महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या/होणाऱ्या गावांतील मिळकत धारकांसह पुणे महापालिकेच्या सर्व मिळकतधारकांना सन २०२१–२२ तसेच त्यापुढील आर्थिक वर्षातील नव्याने तयार होणारी देयके, वॉरन्ट, नोटीसेस, नागरिकांस पाठवावयाची पत्रे यांचे वाटप केंद्र सरकारच्या पोस्ट विभागामार्फत करणेस, तसेच सदरील वाटपाचे कामी आवश्यकतेनुसार पोस्ट विभागास वेळोवेळी धनादेश/ई–पेमेंट द्वारे ॲडव्हान्स रक्कम त्या त्या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पातील अर्थशिर्षक ''RE11G103 मुख्य देखरेख वसुली वगैरे छ कर आकारणी व कर संकलन कार्यालय ३ संकीर्ण'' अथवा त्याअनुषंगाने उपलब्ध इतर अर्थशिर्षकावरून उपलब्ध करून देणेस व त्याअनुषंगाने ॲडव्हान्स रकमांची वेळोवेळी रिकूपमेंट करणेस,**

**२. उपरोक्त सन २०२१–२२ च्या बिलांचे वाटप करणेकामी पोस्ट विभागास प्रतीपत्र रू. २=५० + फ्रँकींग खर्च रू. ०=४० + हाताळणी खर्च रू. ०=३० याप्रमाणे प्रतीपत्रास एकूण रू. ३=२० याप्रमाणे रक्कम अदा करणेस,**

**३. सन २०२१–२२ नंतरच्या नवीन आर्थिक वर्षांकरीता पोस्ट विभागाकडून नव्याने कोटेशन मागविणे. नव्याने मागविलेल्या कोटेशन मधील दर प्रतीपत्र रू. २=५० + फ्रँकींग खर्च रू. ०=४० + हाताळणी खर्च रू. ०=३० याप्रमाणे प्रतीपत्रास एकूण रू. ३=२० पेक्षा जास्त आल्यास म्हणजेच पोस्ट विभागाच्या दरात बदल झाल्यास वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार सुधारीत दराने रक्कम अदा करणेचे अधिकार मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना देणेस व सदर मान्यतेनुसार पोस्ट विभागास ॲडव्हान्स / बीले अदा करणेस,**

**४. मिळकत कराची संबंधित आर्थिक वर्षातील नव्याने तयार होणारी देयके, वॉरन्ट, नोटीसेस इ. चे वाटप करणेकरीता येणारा खर्च उपरोक्त क्र.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ज्या अर्थशिर्षकावरून ॲडव्हान्स/उचल घेतली असेल त्या अर्थशिर्षकावर खर्ची टाकणेस,**

**५. सन २०२१–२२ व त्यापुढील नवीन आर्थिक वर्षांकरीता मिळकत कर मुदतीत भरल्यास मिळकत धारकांना देण्यात येणाऱ्या सवलतीबाबत व मुदतीत कर न भरल्यास आकारण्यात येणाऱ्या दंडाबाबत जनजागृती करणेसाठी–**

- **पुणे शहरातील गजबजलेली ठिकाणे / चौक इ. ठिकाणी आकाशचिन्ह परवाना विभाग यांचे माध्यमातून दिशादर्शक कमानीवर जाहीरात करणेस,**
- **प्रेसनोटच्या माध्यमातून जाहिरात करणेस,**
- **आवश्यकतेनुसार खासगी जाहिरातदाराकडून योग्य त्या दृक–श्राव्य (व्हिडीओ–ऑडीओ) स्वरूपातील जाहिराती तसेच सोशल मिडीयासाठी आवश्यक त्या जाहिराती तयार करणे व त्यांचे प्रेक्षपण रेडीओ, चित्रपटगृहे, खासगी चित्रपटगृहे तसेच खासगी ठिकाणी करून जनजागृती करणे. सदरकामी येणारा खर्च संबंधित आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पातील अर्थशिर्षक ''RE11G103 मुख्य देखरेख वसुली वगैरे छ कर आकारणी व कर संकलन कार्यालय ३ संकीर्ण'' या अर्थशिर्षकावरून अदा करणेस,**

विषय क्रमांक :– १०७८ त्वर्य

प्रभाग क्रमांक १२ क मध्ये कै.बाळासाहेब ठाकरे उद्यान येथे डायनासोर पार्क तयार करणेसाठी Soft सिलिकॉन मेटलस्ट्रक्चर असलेले डायनासोर पुरविणे, बसविणे व चालू करून देणे हे काम कै.बाळासाहेब ठाकरे उद्यान येथे करण्याऐवजी प्र.क्र.१२ मधील तात्यासाहेब थोरात उदयान येथे करणेस मान्यता मिळणेस व त्यानुसार सदर बाब निदर्शनास आणल्याची नोंद घेण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/विदयुत/६७१ दि.१/२/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– १०७९ त्वर्य

भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय स्थापित करणेकामी पुणे महानगरपालिका व पुणे महानगरपालिका – मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट यांचेमध्ये Consortium (सहाय्यता संघ) तयार करणेस रक्कम रूपये १,९२,९३,५००/–( अक्षरी रक्कम रूपये एक कोटी ब्यान्नव लाख त्र्यान्नव हजार पाचशे रूपये) Inspector general of registration,Maharashtra यांचे कडे मुद्रांक शुल्क भरणे कामी व सह. दुय्यम निबंधक कार्यालय हवेली १०, पुणे यांचेकडे रक्कम रूपये ३१,६४०/– (अक्षरी रक्कम रूपये एकतीस हजार सहाशे चाळीस रूपये फक्त) नोंदणी शुल्क व दस्त हाताळणी फी अदा करणे पोटी असे एकुण रक्कम रूपये१,९३,२५,१४०/– (अक्षरी एक कोटी त्र्यान्नव लाख पंचवीस हजार एकशे चाळीस रूपये) अदा केलेली असून सदर बाबीस पश्चात मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/६७४ दि.१/२/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :- १०८० त्वर्य

कोथरुड बावधन क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात प्रभाग क्र. १२ मध्ये विविध रस्त्यांवर पाणीपुरवठा वाहीनी/मल:सारण वाहीनी/गॅस वाहीनी/वीज वाहीनी तसेच केबल खोदाईचे रिईन्स्टेटमेंट करणे तसेच इतर तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १० टेंडर्सपैकी ठेकेदार मे.काशीनाथ सिताराम कुमावत यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४४,१४,८८४=०५ पेक्षा ३६.६०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२७,९९,०३६=४९ पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये५,२९,७८६=०९ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये ५५,१२२=६० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ०=०० पर्यंत अदा करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/६८४ दि.२/२/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :- १०८१ त्वर्य

कै.बाबुराव सणस मैदानावर सिंथेटिक ट्रॅकसाठी रिसरफेसिंग करणे (मनपा रजि. अट शिथिल) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.ॲडव्हान्स स्पोर्टस टेक्नॉलॉजी एल.एल.पी. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३,७१,८५,७८७/- पेक्षा १.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३,६८,१३,९२९=१३ पर्यंत अधिक जी.एस.टी. र.रुपये ४४,६२,२९४=४४ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये ५१,९१८=४२ पर्यंत या कामासाठी टेंडर अटी शर्तीनुसार काम करुन घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/६८५ दि.२/२/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :- १०८२ त्वर्य

नगरसचिव कार्यालयाकडील सेवक श्री.दादाभाऊ पोशा पोटे हुद्दा-कार्यालय अधिक्षक यांना दि.२२/५/२०१९ रोजी अर्धांगवायूचा झटाका आल्याने त्यांनी वैद्यकिय रजेची मागणी केली होती. त्यांच्या खाती पुरेशी वैद्यकिय रजा शिल्लक नसल्याने त्यांची दि.२२/५/२०१९ ते दि.२९/३/२०२० अखेर शिल्लक असलेली ३१३ दिवस हक्काची रजा खर्ची टाकण्यास पश्चात मान्यता द्यावी. तसेच विशेष आजारपणी रजा दि.३०/३/२०२० ते २९/३/२०२१ अखेर ३६५ दिवसांची विशेष आजारपणाची(पक्षाघात) रजा मनपा अधिनियम १९४९ चे कलम ४६५(१)(क)अन्वये व मनपा मुख्य सभा ठ.क्र.२१५,दि.२७/९/२०१०अन्वये रजा देता येते.
तरी श्री.पोटे दादाभाऊ पोशा हुद्दा-कार्यालय अधिक्षक यांना वरील कालावधीमधील हक्काची रजा व विशेष आजारपणाची रजा खर्ची टाकणेस मान्यता देण्याबाबत मा.नगरसचिव यांचे जा.क्र. ३६५५ दि.२/२/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :- १०८३ त्वर्य

नगरसचिव कार्यालयाकडील सेविका श्रीमती उर्मिला रमाकांत यादव यांचे दि.१/४/२०२० ते दि.२८/२/२०२१ अखेर कामावर अनुपस्थित असल्याने तसेच त्यांच्या खाती कोणतेही रजा शिल्लक नसल्याने त्यांची दि.१/४/२०२० ते दि.२८/२/२०२१ अखेर या कालावधीमधील ३३४ दिवस बिनपगारी रजेस मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ५७(३)अन्वये रजा मंजूर करण्याबाबत मा.नगरसचिव यांचे जा.क्र. ३६५८ दि.२/२/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :- १०८४ त्वर्य

मा.प्रविण चोरबेले व मा.सम्राट थोरात यांचे दि. १/२/२०२१ चे पत्र.

कृषी उत्पन्न बाजार समिती ही महाराष्ट्रातील दोन नंबरची मार्केट असून संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी वर्ग आपल्या शेतात पिकविलेला माल घेऊन मोठ्या प्रमाणात ह्या मार्केटमध्ये येतो. यामुळे पुणे बाजार समितीमध्ये मालाची दैनंदिन आवक खूप मोठ्या प्रमाणत आहे. परंतु दिवसेंदिवस याचे प्रमाण वाढत असल्याने ही जागा कमी पडत आहे. तसेच आपला माल सुरक्षित ठेवण्यासाठी काही व्यापाऱ्यांनी तात्पुरत्या स्वरुपाची शेड बांधली आहेत.

पुणे बाजार समिती मार्फत मार्केटमधील रस्ते, लाईट, पाणी, स्वच्छता आदींची कामे केली जातात. तसेच संबंधित व्यापारी हे बाजार समितीला शुल्क भरतात व मुख्य भूखंडाचा कर पुणे महानगरपालिकेकडे जमा करतात.

तरी तात्पुरत्या स्वरुपात बांधण्यात आलेल्या शेडकरीता जो कर आकाराला जात आहे त्यामध्ये सवलत देण्यास मान्यता देण्यात यावी.

विषय क्रमांक :– १०८५ त्वर्य

मा.दिपक पोटे व मा.सौ.वर्षा तापकीर यांचे दि. २/२/२०२१ चे पत्र.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पुणे मनपा आरोग्य विभागामार्फत एकवट मानधन तत्वावर काही कर्मचाऱ्यांना ०६ महिने करीता व काही कर्मचाऱ्यांना ४५ दिवसांकरिता प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून कामावर रुजू करून घेण्यात आले होते. सर्व कर्मचारी प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून एकवट मानधन तत्वावर काम करणारे सर्व कोविड योद्धा म्हणून आरोग्य विभागाच्या कोविड सेंटर, स्वॅब सेंटर, दवाखाना येथे सेवा करीत होते. कोरोना सारख्या महामारीच्या काळामध्ये सर्व कर्मचाऱ्यांनी जीव धोक्यात घालून प्रामाणिकपणे कार्य करत होते. तसेच कोरोनाचा प्रादुर्भाव जरी कमी झाला असला तरी कोरोना पूर्णपणे गेलेला नाहीये. तसेच नवीन कोरोना उद्भवला आहे. अशा परिस्थितीमध्ये व भविष्यात या सर्व कर्मचाऱ्यांची गरज भासणार आहे. मे.शासनाच्या वतीने कोविड-१९ व्हॅक्सीनचे लसीकरण झालेले आहे. या उपक्रमासाठी सर्व प्रयोगशाळा सहाय्यक सेवकांची गरज भासणार आहे.तरी सर्व आरोग्य विभागाकडे कोरोनाच्या पार्श्वभूमीवर प्रयोगशाळा सहाय्यक सेवकांना दि.३१ मार्च २०२१ पर्यंत मुदतवाढ देऊन रुजू करून घेण्यास मान्यता देण्यात यावी.

विषय क्रमांक :– १०८६ त्वर्य

पुणे महानगरपालिका बालेवाडी स्टेडियम वसतीगृह येथे अंतर्गत बालेवाडी स्टेडियम येथे ॲल्युमिनियम पार्टीशन करणे. हे काम तातडीने करावयाचे असल्याने जाहिर निविदा न काढता ठेकेदार मे. शुभम कन्स्ट्रक्शन यांचेकडून या एजन्सीकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये करुन घेणेस व करार करणेस तसेच याकामी दि.३१.०७.२०२० पर्यत र.रु. २०,१३,५९९/– व सदरचे काम संपेपर्यंत होणारी रक्कम अधिक जी.एस.टी. व अधिक कर याप्रमाणे होणाऱ्या कामाचे बिल ठेकेदारास अदा करणेसाठी खालील बाबी मा.मुख्य सभेचे निर्देशनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प.क्र.२/६६३ दि.१/२/२०२१ चे पत्र.

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये सदरची कामे ठेकेदार मे.शुभम कन्स्ट्रक्शन यांची नेमणूक करून त्याचे बरोबर करारनामा करुन घेणेस,
२. सन २०२०–२०२१ चे अंदाजपत्रक महसुली कामांसाठी – RE17F257 Covid-19 अंतर्गत आवश्यक महसुली कामांसाठी (खर्च) या अर्थशिर्षकामधून अदा करण्यास,
३. ॲल्युमिनियम पार्टी. इ. कामे दि.२५/०६/२०२० ते ३/११/२०२० चे अखेर पर्यंतचे र.रु. २०,१३,५९९/– बील आदा करणेस ठेकेदार मे.शुभम कन्स्ट्रक्शन यांचे याकामी होणारी रक्कम जी.एस.टी. सह व अधिक कर याप्रमाणे होणाऱ्या कामाचे बिल ठेकेदारास अदा करणेस,

विषय क्रमांक :– १०८७ त्वर्य

पुणे महानगरपालिका परिमंडळ क्र. ३, सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत कोविड-१९ या रोगाच्या निवारणार्थ स्थापन करण्यात आलेल्या आयसोलेशन सेंटर/क्वारेंटाईन सेंटर/ सी.सी.सी. सेंटर येथे दररोज उपचारासाठी दाखल होणाऱ्या नागरिकांची राहण्याची सोय करण्यात आली असल्याने तेथील विद्युत विषयक कामे जाहिर निविदा न काढता अशा स्वरुपाचे काम करणाऱ्या तज्ञ मनपा मान्यताप्राप्त एजन्सी/ठेकेदार मे.गंगो माउली इलेक्ट्रिकल्स या एजन्सी कडून दिनांक ०२/०५/२०२० पासून ते २५/०६/२०२० पर्यंत २०१९-२० च्या शेड्युल मान्य मान्य दराच्या १५ % कमी दराने सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७(३)(क) अन्वये रक्कम रु. २,२४,८७९=६५ + १२% GST सह रक्कम रु. २६,९८१=९५ असे एकूण २,५१,८३१=६० पर्यंत करुन घेण्यात आलेले असून या कामांची माहिती मा. मुख्य सभा पुणे म.न.पा. यांच्याकडे पश्चात माहितीसाठी व अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प.क्र.३/६६४ दि.१/२/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :- १०८८ त्वर्य

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३ )(क )मधील तरतुदीनुसार नगररोड वडगांवशेरी क्षेत्रिय कार्यालयातंर्गत कोवीड -१९ विषाणुचा प्रसार रोखण्यासाठी एस आर ए स्कीम विमाननगर कोवीड सेंटर येथे विदयुत विषयक कामे करणे तातडीचे व अत्यावश्यक काम हे मे.ओंकार इलेक्ट्रीकल्स ॲण्ड टेक्निकल सर्व्हिसेस यांचेकडून करुन घेतली असल्याने देयक अदा करणेची कार्यवाही बाबत खालील बाबी मा.मुख्य सभेस मान्यतेस सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प.क्र.१/६६५ दि.१/२/२०२१ चे पत्र.

१.प्रस्तुत खर्च महसुली कामांसाठी बजेट कोड क्र.RE17F257,COVID-19 अंर्तगत अत्यावश्यक महसुल कामासाठी (खर्च) अर्थशिर्षकामधुन रक्कम अदा करणेस,

२.मे ओंकार इलेक्ट्रीकल्स ॲण्ड टेक्निकल सर्व्हीसेस यांचे दिनांक १०/०६/२०२० ते१८/०७/२०२०पर्यंतचे रक्कम रुपये २,२८,७९८=०८(रक्कम रुपयेदोन लाख अठ्ठावीस हजार सातशे अठयानव आणि पैसे आठ फक्त) बिल अदा करणेस

विषय क्रमांक :- १०८९ त्वर्य

प्रभाग क्र. 20 मध्ये डॉ.नायडू हॉस्पीटल येथे विविध स्थापत्य विषयक कामे करणे या कामास तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये ठेकेदार मे.आर्या कन्स्ट्रक्शन यांचेकडून करुन घेतलेल्या अत्यावश्यक स्थापत्य विषयक केलेल्या कामाचे आणि कामानुसार रक्कम रुपये ९,९९,८७३=७८ जी.एस.टी सह बिल अदा करणे.इ.बाबी मा.मुख्य सभा यांचे निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प.क्र.१/६६७ दि.१/२/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :- १०९० त्वर्य

पुणे महानगरपालिका झोन क्र. २ - कोथरुड-बावधन क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत श्री.शिवछत्रपती म्हाळूंगे बालेवाडी क्रिडा संकुल येथील बालेवाडी कोविड केअर सेंटर व कोथरुड परिसरामध्ये विविध विकास कामे करणे. येथे सिव्हिल वर्क करणे इ. कामे तातडीने करावयाचे असल्याने जाहिर निविदा न काढता ठेकेदार मे. स्वप्निल एन्टरप्रायजेस यांचेकडून या एजन्सीकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस तसेच याकामी दि.२५/१०/२०२० पर्यत र.रु. ९,७१,९७६=०९ व सदरचे कामास होणारी रक्कम अधिक जी.एस.टी. व अधिक कर याप्रमाणे होणाऱ्या कामाचे बिल ठेकेदारास अदा करणेसाठी खालील बाबी मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प.क्र.२/६६९ दि.१/२/२०२१ चे पत्र.

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये सदरचे कामी ठेकेदार मे. स्वप्निल एन्टरप्रायजेस यांची नेमणूक करणेस व त्यानुसार त्यांचेबरोबर करारनामा करुन घेण्यास, दि. ३०/१०/२०२० पर्यंत ठेकेदार मे. स्वप्निल एन्टरप्रायजेस यांचे या कामास कार्योत्तर मान्यता देण्यास व सदरचे कामास होणारी र.रु. ९,७१,९७६=०९ अधिक जी.एस.टी. व अधिक कर याप्रमाणे होणाऱ्या कामाचे बिल ठेकेदारास अदा करण्यास तसेच सदर देयक सन २०२०-२०२१ चे अंदाजपत्रक महसुली कामांसाठी - RE17F257 Covid-19 अंतर्गत आवश्यक महसुली कामांसाठी (खर्च) या अर्थशिर्षकामधून अदा करण्यास,

विषय क्रमांक :- १०९१ त्वर्य

महापौर विकास निधीतून ससून सर्वोपचार रूग्णालयाकरीता कोव्हिड १९ साठी प्रतिबंधात्मक उपाय योजनेकरीता कोरोना रूग्णांकरीता Abbott Real Time SARS-2 किट M/s Abbott Healthcare Pvt.Ltd. यांचेकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) नुसार र.रु.५५,७६,९६३/- पर्यंत खालील अर्थशिर्षकामधून खरेदी करण्यात आली असून सदरची बाब मा.मुख्य सभेस अवलोकनार्थ सादर करण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/६७० दि. १/२/२०२१ चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०२०-२१ RE 17-31-F/RF-167

महापौर निधी. मान्य तरतूद रक्कम रूपये ४,००,००,०००/- पैकी रक्कम रूपये ५५,७६,९६३/-

विषय क्रमांक :– १०९२ त्वर्य

पुणे महानगरपालिका झोन क्र.३ अंतर्गत सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाचे अंतर्गत पुणे म.न.पा.चे कै.मुरलीधर लायगुडे या हॉस्पीटल इमारत व पोकळे शाळा येथे पुणे मनपा तर्फे स्थापित केलेल्या आयसोलेशन/ क्वारंटाईन /ccc क्रेंद्रासाठी दररोज दाखल होणाऱ्या कोरोना बाधित नागरिकांना दैनंदिन सकाळी चहा , नाष्टा, दुपारचे जेवण,रात्रीचे जेवण, गरजेनुसार बिस्लेरी पाणी बॉटल व इतर आवश्यक बाबी तयार अन्न पुरविणे सदरचे काम मोठया स्वरुपाचे व तातडीचे असल्याने जाहिर निविदा न काढता अशा स्वरुपाचे काम करणाऱ्या तज्ञ एजन्सी १) मे.रूचिरा केटरर्स २) मे.आदित्य सप्लायर्स या एजन्सी कडुन माहे सप्टेंबर २०२० मधील दि.०१/०९/२०२० व दि.३०/०९/२०२० अखेरचे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७(३)(क) अन्वये करणेस खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आलेली असून सदर बाब मा.मुख्य सभेच्या अवलकोनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प.क्र.३/६७५ दि.१/२/२०२१ चे पत्र.

१) मे.रूचिरा केटरर्स यांनी कै.लायगुडे हॉस्पीटल येथे दि. १/९/२०२० ते दि. ३०/९/२०२०अखेर पुरविलेल्या मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ठ (अ –१) प्रमाणे सकाळचा नाष्टा त्याचा एकूण खर्च र.रू.१५,०००/– १०% जी.एस.टी सह र.रू.१६,५००/–यांना आदा करणेस व मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ठ (अ–२) प्रमाणे दुपारचे व संध्याकाळचे जेवण यांचा एकूण खर्च र.रू.६७,५००/– १०% जी.एस.टी सह र.रू.७४,२५०/–यांना आदा करणेस,

२) कै.वस्ताद हरिभाऊपोकळे शाळा अवेटेड कक्ष येथे मे.आदित्य सप्लायर्स यांनी सदर ठिकाणी दररोज गरजेनुसार बिस्लेरी पाणी बॉटल पुरविलेले आहेत त्यांनी केलेल्या कामाचे मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ठ (ब) नुसार असे या सोबत असून त्यांचे मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ठ (ब) प्रमाणे बिस्लेरी पाणी बॉटल खर्च र.रु.२३,०४०/– येत असुन +१०% जी.एस.टी.सह एकुण र.रु. २५,३४४/– होत आहे .तो त्यांना अदा करणेस

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | कामाचा कालावधी | पुरवठादार/ठेकेदाराचे नाव | जी.एस.टी सह खर्च र.रू |
|---|---|---|---|---|
| १) | कै.मुरलीधर लायगुडे या हॉस्पीटल इमारत येथे नाष्टा व जेवण पुरविणे | दि १/०९/२०२० ते दिं ३०/०९/२०२० | मे. रूचिरा केटरर्स<br>अ)नाष्टा खर्च<br>ब)जेवण खर्च | <br>१६५००/–<br>७४२५०/– |
| २) | कै.वस्ताद हरिभाऊ पोकळे शाळा अवेटेड कक्ष | दि १/०९/२०२० ते दिं ३०/०९/२०२० | मे.आदित्य सप्लायर्स<br>अ)पाणी बॉटल खर्च | <br>२५३४४/– |
| | | | **एकुण र.रू** | **१,१६,०९४/–** |

२) वरील १ व २ प्रमाणे खर्च खालील अर्थशिर्षकावर करणेस,

अर्थशिर्षक – सन २०२०–२१ चे अंदाजपत्रक

Covid-19 अंतर्गत अत्यावश्यक भांडवली महसूल कामासाठी (खर्च)

RE17F257

विषय क्रमांक :– १०९३ त्वर्य

मा.दिपक पोटे व मा.सौ.वर्षा तापकीर यांचे दि. २/२/२०२१ चे फेरविचाराचे पत्र.

पुणे मनपा करीता कचरा वाहने चालविणेसाठी ठेका पध्दतीने वाहन चालक सेवक पुरविणे या कामाकरीता मा.स्थायी समितीने दि. १९/१/२०२१ रोजी मान्य केलेल्या स्थायी समितीठराव क्र. १०२३ ला दि. १ जानेवारी २०२१ ते माहे फेब्रुवारी २०२१ अखेर पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात यावी.

शिवाजी दौंडकर
प्रभारी नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.